**विषय :- अनुसूचित क्षेत्रात कार्यरत पर्यवेक्षिका यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर समाजोजनाने पदस्थापना देणे बाबत.**

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीबीसी/२०२३/प्र.क्र.५४/आरक्षण/५ दि.०५/१०/२०२४.

२. ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक 15 मे 2023

३.अनुसूचित क्षेत्रात कार्यरत पर्यवेक्षिका यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर पदस्थापनादेणे बाबत समुपदेशन प्रक्रिया दि. 18 /03/2025

-आदेश-

जा.क्र. जि.प. अहिल्यानगर/मबावि/कार्या-1/ 231 /2025 अ. नगर दि. 01 /04/2025

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेने एकूण 01 उमेदवारास 25 टक्के अनुसूचित (पेसा) क्षेत्रात मानधन तत्वावर पर्यवेक्षिका म्हणून पंचायत समिती अकोले येथे नियुक्ती देण्यात येणार आहे.सदर उमेदवारांस अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रामध्ये नियुक्ती देणे आवश्यक आहे, तथापि अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रामध्ये बिगर अनुसूचित क्षेत्रातील रहिवासी असलेल्या पर्यवेक्षिका कार्यरत असल्यामुळे सदर पर्यवेक्षिकांचे समायोजन करणे आवश्यक आहे. सदरबाब विचारात घेता अनुसूचित क्षेत्रात कार्यरत असलेले तथापि अनुसूचित क्षेत्राचे रहिवासी नसलेले बिगर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पुढील पर्यवेक्षिका यांना अनुसूचित क्षेत्राबाहेरील रिक्त अंगणवाडी केंद्रामध्ये मध्ये संदर्भ क्र.२ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे पुढील प्रमाणे समायोजनाने पदस्थापना देऊन पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणेसाठी या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पर्यवेक्षिकेचे नाव | सध्याचे कार्यालय | समुपदेशनाने दिलेली पदस्थापना |
|---|---|---|---|
| 1 | श्रीम. सोनाली रमेश कुळधरण | बीट- समशेरपुर<br>एबाविसेयो प्रकल्प - अकोले | बीट-जवळे बाळेश्वर<br>एबाविसेयो प्रकल्प - घारगाव-1 |
| 2 | श्रीम. मुन्तोडे सुरेखा चंद्रभान | बीट-कोतुळ<br>एबाविसेयो प्रकल्प - अकोले | बीट-घारगाव-1<br>एबाविसेयो प्रकल्प - घारगाव-1 |

बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयोजना प्रकल्प अकोले यांनी वरील कर्मचा-यांना समायोजित करण्यात आलेल्या ठिकाणी हजर होणेसाठी त्यांचेकडील कार्यभाराबाबत पर्यायी व्यवस्था करून तातडीने कार्यमुक्त करावे वकेलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.सदर आदेश जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्यांचा सांकेतांक क्रमांक 202504010 80006 आहे.

**(आशिष येरेकर भा.प्र.से. )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अहिल्यानगर**

प्रति,

संबंधित कर्मचारी, द्वारा- बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो- अकोले

२/-संबंधित कर्मचारी यांनी आदेशात नमूद केलेप्रमाणे समायोजित ठिकाणी हजर व्हावे. सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अथवा कुठलाही दबाव आणल्यास आपणाविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**प्रत- माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना-**

- गटविकास अधिकारी, पंचायत समिती - अकोले / संगमेनर
- बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो- अकोले / घारगाव - 1